Indian Streams Reserach Journal
Vol.1,Issue.XII/Jan; 12pp.1-4

ISSN:-2230-7850

Research Papers

# ''कुक्कुटपालन व्यावसायिकांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास''

प्रा. डॉ. विकास ज. पवार
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
सी. के. गोयल महाविद्यालय, दापोडी,पुणे 12.

## प्रस्तावना :–

भारत हा कृषीप्रधान देश आहे. परंतु अलिकडील काळात दुष्काळ, पाणीटंचाई, विजटंचाई, शेतमालास योग्य भाव न मिळणे, कर्जभार, शासकीय योजनांची योग्य अंमलबजावणी नसणे या वेगवेगळया कारणामुळे शेतीव्यवसाय धोक्यात आला आहे. त्यामुळे अलीकडे शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत. त्यामुळे शेतीस पुरक असणाऱ्या व्यवसायांचा विकास होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यादृष्टीने कुक्कटपालन व्यवसाय हा एक अत्यंत महत्वाचा विकसित होणारा व्यवसाय आहे. त्यामुळे कुक्कुटपालन व्यवसायास आधुनिक काळात महतव प्राप्त होत आहे.

भरतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान आहे. शेती व्यवसाय हा निसर्गावर अवलंबुन आहे. नैसर्गिक घटकांची शाश्वती नसल्यामुळे व पर्जन्यमान कमी –अधिक असल्यामुळे शेती व्यवसाय धोक्यात आला आहे. शेतीला पुरक व्यवसाय म्हणुन अलीकडे कुक्कुटपालन व्यवसाय संपुर्ण जगात एक यशस्वी व्यवसाय म्हणून नावारुपाला आला आहे. घरगुती छोटया प्रमाणावर चालणाऱ्या कुक्कुटपालन व्यवसायाचे रुपांतर व्यावसायिक कुक्कुटपालनांमध्ये व्हायला 1960 मध्ये सुरुवात झाली. ब्रॉयलर कुक्कुटपालनाला व्यावसायिक स्वरुप भारतांमध्ये प्रथम 'अर्बर ऐक्रेज' या अमेरिकन कंपनीने 1960 ते 70 च्या दशकामध्ये आणले. पुण्याजवळ तळेगाव येथे या कंपनीने पहिल्या अद्यावत आधुनिक अशा अंडी उबवणूक केंद्राची (हॅचरी) मुहर्तमेढ रोवली.

सध्या वाढत्या लोकसंख्येच्या अन्नविषयक गरजा भागविण्यासाठी प्रानिजन्य पदार्थाच्या मागणीमध्ये वाढ होत आहे. भारतासारख्या प्रगतशील देशामध्ये कुपोषणाचा प्रश्न प्रभावीपणे हाताळण्यासाठी दूध अंडी व मांस (चिकन) हे तुलनेने स्वस्त, सर्वत्र उपलब्ध होणारे व चांगल्या प्रतिच्या प्रथिनांचे, क्षार व जिवनसत्वांचे भांडारच असल्यामुळे मानवाचा आहार संतुलीत करण्यासाठी याचा वापर करता येतो. कुक्कुटपालन व्यवसायातून निर्यातीच्या संधीही मोठया प्रमाणावर वाढत आहेत भारतातून प्रामुख्याने खाण्याची अंडी (ज्इसम म्हहे) कवचरहीत अंडी (थ्तव्रमद म्हहे) उबणुकीची अंडी (भ्बबीपदह म्हहे) अंडी पावडर (म्हह च्वूकमत) व पोल्ट्री मांसाची निर्यात होते. सध्या कुक्कुटपालन व्यवसायाचा विकासदर 16टक्के ते 18 टक्के आहे अंडयांच्या उत्पादनात भारताचा जगात तिसरा क्रमांक लागतो भारतातील अंडयाचे वार्षिक उत्पादन 50,000/– दशलक्ष आहे त्याचे मूल्य 6300 कोटी रुपये आहे. कोंबडी मांसाचे (ब्रायलर) उत्पादनात भारताचा जगात पाचवा क्रमांक ओ. त्याचे वार्षिक उत्पादन 2.25 दशलक्ष असून त्याची किंमत 9000 कोटी रुपये आहे. भारतातील पोल्ट्री उत्पादनांची निर्यात 1995–96 ला 26.21 कोटी रुपयाची होती तीच निर्यात 2005–06 मध्ये 167 कोटी रुपये पर्यंत वाढली आहे. यासर्व दृष्टीने कुक्कुटपालन व्यवसायास महत्व प्राप्त होत आहे.

***विषयाचे महत्व***

1) कुक्कुटपान व्यवसाया हा देशातील प्रमुख शेतीसंबधीत व्यवसायापैकी एक प्रमुख व्यवसाय आहे.
2) कुक्कुटपाल व्यवसाया हा देशातील प्राणीज व्यवसायातील वेगाने वाढणारा व्यवसाय आहे.
3) कुक्कुटपान व्यवसायामध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतो अभ्यासाची उद्‌दष्टे
1) कुक्कुटपालन व्यवसायिकांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करणे
2) कुक्कुटपालन व्यवसायिकांच्या समस्यांचा अभ्यास करणे

संशोधन पध्दती : कुक्कुटपालन व्यावसायिकांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थीचा अभ्यास करण्यासाठी पुणे जिल्हयातील शिरुर तालुक्यातील आंधळगाव व शिक्रापूर या दोन गावातील अनुक्रमे 11

Indian Streams Reserach Journal
Vol.1,Issue.XII/Jan; 2012

व 13 कुक्कुटपालन व्यावसायिकांची प्राथमिक माहिती घेतली आहे. तसेच प्रकाशित दुय्यम साहित्याचा वापर केला आहे.

तक्ता क्र.१

पुणे जिल्हयातील पशुधन

| अ.नं. | वर्ष | एकुण पशुधन | एकुण कोंबडया | एकुण कुक्कुट जातीच्या पक्षांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २००४–०५ | २२,९०,०८१ | २१,५८,५९४ | ३९,४१,९८५ |
| २ | २००५–०६ | २२,९०,०८१ | २१,५८,५९४ | ३९,४१,९८५ |
| ३ | २००६–०७ | २२,९०,०८१ | २१,५८,५९४ | ३९,४१,९८५ |
| ४ | २००७–०८ | २०,२२,९४३ | १७,३२,२९१ | ५४,७८,२२२ |
| ५ | २००८–०९ | २०,२२,९४३ | १७,३२,२९१ | ५४,७८,२२२ |

***आधार – पुणे जिल्हा सामाजिक व आर्थिक सामालोचन***

वरील तक्त्यात पुणे जिल्हयात असणाऱ्या पशुधनाची स्थिती दर्शविली आहे. 2004–05 ला एकुण पशुधन 22,90,081 होते तेच 2008–09 ला 20,00,943 इतके कमी झाले एकुण कोंबडया याच काळात 21,58,594 होत्या त्या 17,32,943 इतक्या कमी झाल्या आहेत. मात्र याच काळात एकुण कुक्कुटजातीच्या पक्षांची संख्या 39,41,985 वरुन 54,78,222 इतकी वाढली आहे.

तक्ता क्र. २

शिरुर तालुक्यातील पशुधन

| अ.नं. | वर्ष | एकुण पशुधन | एकुन कोंबडया | एकुण कुक्कुट जातीच्या पक्षांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २००४–०५ | २,०६,८१३ | १,१४,०९५ | २,१४,८९८ |
| २ | २००५–०६ | २,०६,८१३ | १,१४,०९५ | २,१४,८९८ |
| ३ | २००६–०७ | २,०६,८१३ | १,१४,०९५ | २,१४,८९८ |
| ४ | २००७–०८ | १,९६,६५२ | १,१५,५७६ | २,३०,५२९ |
| ५ | २००८–०९ | १,९६,६५२ | १,१५,५७६ | २,३०,५२९ |

आधार– पुणे जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

वरील तक्त्यात शिरुर तालुक्यात असणाऱ्या पशुधनाची स्थिती दर्शविली आहे. 2004–05 ला एकुण पशुधन 2,08,813 होते ते 2008–09 ला 1,96,652 इतके कमी झाले आहे. याच काळात एकुण कोंबडयाचे प्रमाण 1,14,095 वरुन 1,15,576 इतके वाढले आहे. मात्र एकुण कुक्कुट जातीच्या पक्षांची संख्या याच काळात 2,14,898 वरुन 2,30,529 इतकी वाढली आहे.

तक्ता क्र. ३

ब्रॉयलर कुक्कुटपालनातून मिळणारे प्रतिपक्षी उत्पन्न

| अ. नं. | तपशिल | बॅच क्रमांक | | | | | | सरासरी उत्पन्ना रु |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | |
| १ | सरासरी प्रतिपक्षी वजन(कि. ग्रॅम) | १.७५ | १.७५ | १.७५ | १.७७ | १.७८ | १.७७ | १. ७६ |
| २ | सरासरी प्रतिकिलो किंमत (रु) | ३१.३८ | ३१.०५ | ३१. ६८ | ३१.१६ | ३१.३४ | ३०. ७७ | ३१. २३ |
| ३ | सरासरी प्रतिकिलो उत्पादन खर्च (रु.) | २९.३० | २९.४६ | २९. २३ | २८.९७ | २८.९४ | २८. ८९ | २९. ९२ |
| ४ | सरासरी प्रतिकिला नफा (रु) | २.०७ | १.५९ | २.४४ | २.१९ | २.०० | १.८९ | २.११ |
| ५ | सरासरी प्रतिकिलो निव्वळ नफा (रु) | ४.१० | ३.२५ | ४.७५ | ४.३४ | ४.७३ | ३.८० | ४. १७ |

अधार – Poultry report – Estimation of total production of beroiler MATE and its costing in Maharashtra – March 2006

वरील तक्तयानुसार बॉयलर पक्षांचे सरासरी वजन 1.76 किलो ग्राम असून, त्यासाठी येणारा सरासरी खर्च 43.68 रुपये येतो तर त्यापासून मिळणारे उत्पन्न 47.85 रुपये आहे. म्हणजेच ब्रॉयलर पक्षाचे दोन महिने संगोपन करुन विक्री केल्यास प्रतिपक्षी केवळ 4.17 रुपये निवळ नफा मिळतो. साधारण पणे बहुतांशी फार महे आकारमानाने 1500 पक्षांचे असल्याने उत्पादकांना प्रति बॅच फक्त 6255 रुपये ऐवढे उत्पन्न मिळते.

शिरुर तालुक्यातील आंधळगांव व शीक्रापूर या गावातील कुक्कुटपालन व्यवसायीकांची माहिती संकलीत केली असता. औशधे,कामगार,खाद्य, वाहतुक, विज, कर्जावरल व्याज, या विविध खर्चाचा विचार केल्यास प्रतिपक्षी 16 आठवडयाच्या लेअरचा सरासरी खर्च 386.82 रुपये आढळून आला. तर अंडी, मांस, व विश्ठा, यांची विक्री करुन प्रतिपक्षी 454.6 रुपये इतके उत्पन्न मिळते. याचा अर्थ प्रतिलेअर (बॅच) प्रतिपक्षी सरासरी 67.78 रुपये निवळ नफा मिळतो. साधारण पणे 1500 कोंबडयांची क्षमता असणारे फार्म आहे. म्हणजे अशा व्यवसायीकांना तीन महिन्याला सरासरी 1,01,670 रुपये उत्पन्न मिळते.

प्रत्यक्ष पहाणी नुसार प्रशिक्षण घेतलेल्या व्यवसायीकांचे प्रमाण फक्त 19 टक्के होते. तर प्रशिक्षण न घेतलेलया व्यवसायीकांचे प्रमाण 81 टक्के होते. यावरुन या व्यवसायात व्यवसायीक प्रशिक्षणाचें प्रमाण खुपच कमी आहे. असे दिसून येते. त्यामुळे मिळणाना नफा कमी मिळतो. एकूण 24 कुक्कुटपालन व्यवसायिकांची प्रत्यक्षात माहिती घेतली असता. फक्त एक व्यवसायीक मांस व अंडी उत्पादन घेत होता. बाकी सर्व व्यवसायींक फक्त मांस उत्पान घेणारे व्यवसायीक आहेत. मांसल कोंबडीचे उत्पादन म्हणजे कमी काळात अधिक उत्पन्न मिळवून देणारा व्यवसाय आहे. तसेच उत्पादन खर्च देखील कमी येतो. या पक्षांचे अधिक निगा ठेवावी लागत नाही. कोंबडयांच्या मांसाला बारा महिने बाजारात मागणी असते. त्यामुळे अधिकअधीक व्यवसायीक मांसल कोंबडयांचे उत्पादन करताना अढळत आहेत. एकून कुक्कुटपालन लाभ धारकांपैकी 71 टक्के व्यवसायीकांनी संस्थात्मक घटकाकडून (सहकारी बॅंका, पतसंस्था, सरकारी अनुदान इत्यादी) भांडवल उभारणी केली आहे. तर 29 टक्के व्यवसायीकांनी स्वनिधीचा वापर केलेला दिसून येतो. तसेच 88

टक्के उत्पादकांनी घरचेच मनुश्यबळ वापरेले आढळते तर जे सहकारी कुक्कुटपालन व्यावसायिक आहेत त्यांनीच बाहेरचे मनुश्यबळ कामावर घेतले आहे.

***समस्या –***

1) कुक्कुटपालन व्यावसायिकांना भांडवली खर्च मोठयाा प्रमाणावर करावा लोतो. यासंदर्भात भांडवल उभारना प्रामुख्याने जागा कागदपत्रे. लाईट. वाहतूक मार्ग या बाबत अडचणी येतात.

2) कुक्कुटपालन व्यवसाय हा विखुरलेला असल्यामुळे वाहतुक मार्ग व वाहतुक साधने उपलब्ध होणे अडचणिचे होते.

3) कोबडी खाद्य व औशधे योग्य वेळी उपलब्ध होण्यात अडचण निर्माण होते.

4) अर्थिक परिस्थिती कमकुवत असल्यामुळे जागेवरच कमी किंमतीला व्यापाऱ्यांना कोंबडया विकाव्या लागतात.

निश्कर्श –

1) क्षेत्रीय पाहणीवरुन असे दिसून आले आहे की सर्वाधिक कुक्कुटपालन व्यवसायिक हीन्दू (मराठा) समाजाचे आहेत. त्याचे प्रमाण 68 टक्के आहे. अनुसूचित जातीचे 23 टक्के तर अनुसूचित जमातीचे 8 टक्के व्यवसायिक आहेत.

2) कोंबडया वाढविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पधतीवरुन असे दिसून आले की 98 टक्के व्यावसायिक मांसल कोंबडयांचे उत्पादन करीत असून त्यासाठी ते गादी पध्दतीचा वापर करतात. तर 2 टक्के व्यवसायिक मांसल कोंबडी उत्पादनाबरोबर अंडी उत्पादनही घेतात. यासाठी ते पिंजरा पध्दतीचा वापर करताना दिसतात.

3) कुक्कुटपालन व्यवसायासाठी 91 टक्के व्यवसायिक विजेचा वापर करीत आहेत. अनियमित वीपपुरवठा व भारनियमाचा त्रास सर्वच व्यवसायिकांना होत असून. त्याचा व्यवसायांवर प्रतिकुल परिणाम होत आहे.

4) कॉन्ट्रक्ट फार्मिंग पध्दतीचा वापर 78 टक्के व्यवसायिक करत आहेत. या पध्दतीमध्ये जी कंपनी पिल्लें पुरविते तिच कंपनी खाद्य व औशधोपचाऱ्याच्या सुविधाही परविते. व कोंबडया खरेदी करणे या सुविध परवितात. यात कंपनीचाच फायदा जास्त असतो. पण व्यवसायिकांना या सर्व सुविधा वैयक्तीक पातळीवर पुरविणे शक्य होत नाही म्हणून या पध्दतीचा अवलंब केला जातो.

***शिफारशी –***

1) ग्रामीण भागातील लोकांनी अनिश्चित आशा निसर्ग लहरीवर अवलंबून असणाऱ्या शेतीतील तुंटपुज्या उत्पन्नावरच अवलंबून न राहता नियमीत उत्पन्नात वाढ घडवून आणण्यासाठी,दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळया मेंढया पालन, मधुमक्षिकापालन, मत्स्यपालन या सारखे शेतीपुरक जोडधंदे करावेत.

2) कुक्कुटपालन व्यावसायिकांनी ज्या ठिकाणी व्यवसायासाठी स्वच्छ व मुबल्क पाणी उपलब्ध आहे अशा ठिकाणीच व्यवसाय सुरु करावा.

3) कुक्कुटपालन व्यवसाय करु इच्छिणाऱ्या व्यक्तींनी किमान शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण घेऊनच व्यवसाय सुरु करावा. या मुळे कुक्कुटपालन व्यवसायिकांना या व्यवसायाची, कोबंडयांच्या रोगांची औशधोपचारांची, कोंबडी पालनाच्या आधुनिक पध्दतीची आणि अंडी व मांसांच्या बाजारपेठेची सविस्तर माहिती प्राप्त होईल. त्यामुळे उत्पादकांचे होणारे नुकसन कमीत कमी होऊन हा व्यवसाय फायद्यात येईल.

4) तालुक्यातील कुक्कुटपालन व्यवसायिकांनी सहकारी तत्वावर एकत्र येऊन कुक्कुटपालन व्यवसायिकांची संघटना स्थापन करावी आणि या संघटनेच्या माध्यमातून कुक्कुटपालन व्यवसाया समोरील समस्या दूर कराव्यात.

***संदर्भ सूची –***

1) बावस्कर टेक्नॉलॉजी, कृशीविज्ञन, जुन 2009
2) जोशी स.ना. ' कुक्कुटपालन यशाची गुरुकिल्ली, रघुवशी

***प्रकाशन***

3) जी.एस.पाटणकर ' शेतकऱ्यांचे जोडधंदे, तिसरी आवृत्ती ऑक्टो – 1998
4) कुलकर्णी अनिलकुमार ( कोंबडी पालन, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, प्रथम आवृत्ती 1986)
5) मोरेगांव संतोश, डॉ. पाटील अनिल, स्वयंरोजगारासाठी कोंबडीपालन, (व्यवयायिक माहिती) साकेत प्रकाशन, दुसरी आवृत्ती 2008